# दोन वस्तू

आधी निर्मिले प्रभूने मानवाला
घेतली सृष्टी मग बनवायला
म्हणे ये बस हे बघ शिक बाळा
असे निर्मितीचा आनंद आगळा ||१||

जरी सृष्टी ही सुंदर मनोहर
म्हणे मानव देवा तुझी ना सर
वेडा का तू पुसे हसून ईश्वर
अरे असे माझेच बिंब तू तर ||२||

हो तयार जा आता अवनीवर
निर्मितीचा घे आनंद अनावर
ना ना म्हणे रडे मानव त्यावर
तुला सोडून ना मी कुठे जाणार ||३||

आली त्याची दया दयाळू प्रभूला
म्हणे कायमचे ना जायचे तुला
घे या दोन छान वस्तू वापराया
उपयोगी होतील परत येण्या ||४||

ही अतृप्ती वैरीण समाधानाची
उपभोग सुख ना मिळू देणारी
ही वेदना मैत्रीण दु:ख त्रासाची
दोघी ठेवती सय जिवंत माझी ||५||

– नारायण
०७/३०/२३